[ १५ ] श्री लोकनाथांची आरती

जयदेव जयदेव जय श्री चिन्मयानंदा
आरती ओवाळीतों निज सौख्यानंदा ॥ धृ - ॥

अगाध विद्या साधका शक्ति जागविते
श्रद्धावाना त्वरितचि अनभुति दावीते
शक्तिपातें देसी सत् ब्रह्मानंदा ॥ आरती ॥ १ ॥

संकल्पे ही करितां शक्तिपातासी
रमतो साधक जागे कुंडलिनी जैसी
नियमित साधन देई स्वात्म आनंदा ॥ आरती ॥ २ ॥

रेचक कुंभक मुद्रा न लगे सायास
खुसाल लावा लोचन साधा तंद्रीस
अगम्य महिमा तव हा पदि नत हा माथा ॥ आरती ॥ ३ ॥

योगेश्वेशा सदया श्री लोकनाथा
प्रसन्न करिसी यत्नें श्रीशंकरतीर्था
दीक्षा गुरुत्व देसी श्रीवामन दत्ता ॥ आरती ॥ ४ ॥

प्रसारिली श्रीविद्या श्री वामनद्वारें
पतित जिज्ञासू ते उद्धरिले सारे
आशीर्वच द्या दासा गुरुवर योगिंद्रा ॥ आरती ॥ ५ ॥